Impact Factor : 2.521 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – V, Issue – IV December 2016

# शिक्षणात कला, संगीत आणि नाटकाची भूमिका

**डॉ. शेख एस. जे.,**
**प्राचार्य,**
**शिक्षणशास्त्र महाविद्यालय, चोपडा**
**ता. चोपडा जि. जळगांव**

सर्व साधारणपणे जे चार भिंतीच्या आड दिले जाते त्याला क्षिक्षण असे म्हटले जाते. व्यक्ति चार भिंतींच्या पलीकडे राहून जीवनात आलेल्या अनुभवातून जे शिक्षण घेत असतो त्यास अनौपचारीक शिक्षण असे म्हणतात. व्यक्ति जे जीवन जगत असतो त्यास अनौपचारिक शिक्षण असे म्हणतात. व्यक्ति जे जीवन जगत असतो त्या जीवनातील विविध उपक्रम, कृती, अनुभव हा शिक्षणाचा खरा स्त्रोत असतो. आपण ज्या देशामध्ये राहतो त्या देशाचे किंवा राष्ट्राचे अनंत उपकार व्यक्तीवर असतात. याची जाणीव ठेवून व्यक्तीने आपले उत्तरदायित्त्व निभावले पाहिजे. हा संस्कार शिक्षणातूनच होतो.

ला, संगीत आणि नाटक यातुन नवनवींन अविष्कार होत असतात. 'शिक्षण संजीवनी' ( learnibg to be) या अहवांलात असे म्हटले आहे की, शिक्षणाची विविध माध्यमे - ग्रंथालय, क्रीडांगण, वाचनालय, चित्रपटगृह, सांस्कृतिक संघटना, छंदमंडळे, नाटक, संगीत, शाळा, महाविद्यालय यासारख्या वेगवेगळया माध्यमातुन शिक्षण घडत असते.

**व्हाईट हेड** यांच्या मतानुसार, ''शिक्षणाचा एकच आशय आहे तो म्हणजे जीवन आणि जीवनातील विविधतेने नटलेले अनुभव व त्यांचा अविष्कार म्हणजे शिक्षण होय''.

**पेस्टॉलॉजीच्या** मतानुसार, ''माणसाच्या आंतरिक शक्तीचा नैसर्गिक,सुसंवादी, प्रगतीवर विकास म्हणजे शिक्षण''.

**जॉन डयुई :** ''शिक्षण म्हणजे भविष्यकाळाची तयारी नव्हे तर मुलांचे प्रत्यक्ष अनुभवजन्य जीवन होय''.

**म.गांधी :** व्यक्तिच्या शारीरिक, मानसिक, आध्यात्मिक शक्तिंचा विकास म्हणजे शिक्षण होय.

थोडक्यात वरील व्याख्यांचा विचार करता असे सांगता येईल की, शिक्षणातुन व्यक्तिच्या जीवनाला दिशा मिळत असते पण नाटक, संगीत व कलेच्या माध्यमातून विद्यार्थ्याचे जीवन घडतेच परंतु तो स्वावलंबी बनत जातो. कला प्रकारांच्या विविध माध्यमातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडून येतो. शिक्षणात कला, संगीत आणि नाटकाची भूमिका खालील काही मुद्यांवरून स्पष्ट करता येईल.

**१) व्यक्तिमत्त्वाचा विकास :** प्रत्येक व्यक्तीच्या ठिकाणी विविध क्षमता असतात. सुप्त स्वरुपात असलेल्या क्षमतांचा कमाल पातळीपर्यंत विकास करणे हे शिक्षणाने सहज शक्य होते. व्यक्तीचा ज्ञानात्मक, भावात्मक, आणि क्रियात्मक विकास करणे हे शिक्षणाचे मुख्य कार्य आहे. नाटकामुळे व्यक्तीमध्ये अनेक बदल होत

Impact Factor : 2.521 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – V, Issue – IV December 2016

असतात आणि त्यातूनच त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा विकासही होत असतो. संगीत जीवनातील आनंद आहे. संगीतामुळे जडणघडण होत असते. कला आणि शिक्षण यांचा परस्पर संबंध अधिक आहे. शिक्षणातून तसेच कलेच्या विविध प्रकारांतून व्यक्तीमत्त्वाची जडणघडण होत असते.

**२) नेतृत्व गुणांचा विकास :** लोकशाहीमध्ये लोकांना अनन्य साधारण महत्त्व असते. म्हणून लोकांच्या ठिकाणी नेतृत्व गुणांचा विकास होणे आवश्यक असते. नेतृत्व करणारा समाजाला आपल्यासोबत नेतो या दृष्टीने संवेदनशीलता समाजहित, तत्परता, जाणीव जागृती, विकसनशील दृष्टी असणारे नेतृत्व उदयास आणणे हे शिक्षणाचे कार्य आहे. नाटक वा कला प्रकारांच्या माध्यमाने विद्यार्थ्यांना नेतृत्व देवून त्यांच्यातील नेतृत्व गुणांचा विकास करता येईल.

**३) कर्तव्यांची जाण :** आज प्रत्येक व्यक्ती आपल्या हक्कांबद्यल जागरूक आहे पण कर्तव्यांबद्यल मात्र खूपच उदासिन आहे. आई-वडील, शिक्षक, समाज याविषयी या सर्वांबद्यल आपले काही कर्तव्य आहे याची जाण शिक्षणाने निर्माण होते. नाटक वा इतर कला प्रकारांतूनही विद्यार्थ्यांमध्ये कर्तव्याची जाण निर्माण करता येते. कुठलाही कला प्रकार एका व्यक्तीवर आधारीत नसतो. तेथे प्रत्येकाला आपले कर्तव्य करावेच लागते.

**४) राष्ट्रीयत्वाची जाणीव :** आपण ज्या देशामध्ये राहतो त्या देशाचे किंवा राष्ट्राचे अनंत उपकार व्यक्तीवर असतात. याची जाणीव ठेवून व्यक्तीने आपले उत्तरदायित्त्व निभावले पाहिजे. हा संस्कार शिक्षणातूनच होतो. भारत देश विविधतेने नटलेला आहे. अनेक धर्म, जात, पंथ, वंश, प्रादेशिकता अशा वेगवेगळ्या प्रकारची विविधता असूनदेखील या सर्वात भारतीत्वाचा एकसमानतेचा धागा आहे. तो धागा सांभाळाला पाहिजे. विविध कलाप्रकारांमूळे या वेगळेपणाची माहिती व जाणिव विद्यार्थ्यांना होत असते. नाटकातील वेगवेगळ्या भूमिकाही त्यांच्यात राष्ट्रीयत्वाची जाण निर्माण करतात.

**५) सांस्कृतिक वारशाचे जतन आणि संक्रमण :** जगात अनेक संस्कृती आहेत त्यापैकी भारतीय संस्कृती ही एक आहे. संपन्न, समृद्ध, सांस्कृतिक वारसा आपल्याला वारसा हक्काने उपलब्ध झालेला आहे. प्राचीन काळापासून ते आजपर्यंत भारतीय संस्कृतीत अनेक बदल झालेले आहेत. पण उत्सव, व्रत-वैकल्ये, रूढी परंपरा, साहित्यकला आणि वाङमय यासारखी क्षेत्रे सतत विकसीत होत आहेत. शिक्षणामूळे ज्ञान एका पिढीकडुन दुसऱ्या पिढीकडे संक्रमित होते व त्याचे संवर्धन होत असते. शाळेत विविध उपक्रमांच्या माध्यमातून देखील भारतीय संस्कृतीची ओळख विद्यार्थ्यांना पटवून दिली जाते.

**६) कल्पना शक्तीचा विकास :** शाळेत होणाऱ्या विविध अभ्यासक्रमेतर उपक्रमामध्ये संगीत (गाणी) नृत्य, नाटक, या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या कल्पना शक्तीचा चांगल्याप्रकारे विकास होतो. एखादे गीत एखाद्या नवीन प्रकारात कसे गाता येईल वा एखादा अभिनय नवीन पद्धतीने येईल वा कला नव्याने कशी सादर करता येईल यातून विद्यार्थ्यांच्या कल्पन शक्तीचा विकास होत असतो. कल्पना शक्तीच्या विकासामुळे सर्जनशीतेलाही वाव मिळतो व एखादा नवीन प्रकार उदयास येतो. यामुळे शिक्षणातून विद्यार्थ्यांच्या कल्पना शक्तीला वाव मिळायला हवा.

**७) चांगल्या नागरिकत्वाची निर्मिती :** राष्ट्र सबळ व संपन्न होण्यासाठी चांगले व गतिमान नागरिक हवे असतात. जबाबदारीची जाणीव, सहकार्य, प्रेम, सेवा, कर्तव्याची जाण व नेतृत्व गुण ही चांगल्या नागरिकत्वाची लक्षणे आहेत. शाळेमध्ये इतर उपक्रमांच्या माध्यमातून चांगल्या नागरिकत्वाच्या निर्मीतीसाठी हातभार लावता येईल. नागरिकांमध्ये हे गुण बिंबवण्यासाठी व विकसीत करण्यासाठी शिक्षण हिच सर्जनशीलता प्रक्रिया आहे.

**८) कौशल्यांचा विकास :** मानसशास्त्रीयदृष्टया प्रत्येक बालक काही जन्मजात आनुवंशिक प्रवृत्ती घेऊनच जन्माला येते. शाळेत विविध कला प्रकारंच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना आपल्या मनावर ताबा मिळविणे, सुप्त शक्तीचा विकास करणे, प्रेम, वात्सल्य, राग व द्वेषाची भावना हे कलेद्वारे प्रक्षेपित करणे: यातून त्यांच्या कौशल्यांचा विकास होतो. हावभाव, नृत्य, आवाजातील चढ-उतारपणा, लकबी इ.बाबी कौशैल्यांवर आधारलेल्या असतात.

**९) शिस्त :** कोणत्याही कला प्रकारात शिस्तीला अनन्य साधारण असे महत्त्व आहे. कला स्वयं एक शिस्त आहे. उदा. गाण्यातील सूर, ताल, लय, शिस्तीत असतील तर गाण बहारदार होते. कुठल्याही कला प्रकारच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या शिस्तीचा विकास होत जातो. कलाकारांच्या अंगीही शिस्त असणे आवश्यक असते, त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांच्या अंगीही शिस्त असणे आवश्यक असते.

**१०) शिक्षण पद्धतीत सुधारणा :** आजचे शिक्षण हे शाळा, अभ्यासक्रम आणि परीक्षा यावर आधारलेले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना खरे शिक्षण न मिळता फक्त डोक्यात ज्ञान कोंबणे असाच प्रकार होतो. शिक्षण जर कलेवर आधारित असेल तर शिक्षण मनोरंजक होईल व शिक्षणातील काही घटकांचा समावेश जर कलाप्रकारांच्या माध्यमाने विद्यार्थ्यांसमोर प्रस्तूत केला तर तो भाग त्यांच्या सदैव स्मरणात राहिल. अशाप्रकारे जर शिक्षणात कला, नाटक, व संगीत यांचा समावेश केला गेला तर शिक्षण पद्धतीमध्ये सुधारणा होऊन शिक्षण मनोरंजक होईल. यामुळे शिक्षण ओझे न वाटता आनंददायी वाटेल.

**नाटक :**

बालकांच्या सर्जनशीलता व सौंदर्यशास्त्रीय संवेदनेचे एक साधन मनुष्य हा विचार करणारा प्राणी आहे. त्याला मिळालेल्या या शक्तीमुळेच तो इतर सर्व प्राण्यांपेक्षा श्रेष्ठ ठरतो. मानवाने विचारशक्तीच्या जोरावरच प्राचिन काळापासुन आधुनिक काळापर्यंत प्रगती केलेली दिसुन येते. सर्जलशीलता ही विचारांच्या प्रगल्भतेवर आधारलेली आहे. मानव विचार करुन एखाद्या गोष्टीची प्रतिमा मनात तयार करतो व एखादी नवी सर्जनशील गोष्ट/ वस्तू निर्माण करतो. सर्जनशीलता ही नाटक, संगीत, नृत्य इत्यादी प्रकारांमध्ये आढळते. विज्ञानातदेखील सर्जनशील कल्पना असतात.

नाटकामुळे बालकांच्या सर्वांगीण विकासास हातभार लागतो. नाटक, नाटकातीकल कथानक, पात्रे, एखादी भूमिका यातून त्यांच्यातील सौंदर्यशास्त्रीय क्षमतेचा विकास होतो. नाटकामुळे विद्यार्थ्यांमधील सर्जनशील व सौंदर्यशास्त्रीय संवेदनेचा कसा विकास होतो हे पुढील मुद्यांद्वारे स्पष्ट करता येईल.

नाटकामुळे विद्यार्थ्यांमधील सर्जनशील व सौंदर्यशास्त्रीय संवेदनेचा होणारा विकास खालीलप्रमाणे सांगता येईल -

**१) कल्पनाशक्तीचा विकास :** 'भारताचे भवितव्य वर्गखोल्यांमध्ये घडत आहे.' असे कोठारी आयोगाने म्हटल्याप्रमाणे विद्यार्थी शाळेत आपले व राष्ट्राचे भावी जीवन समृद्ध करण्यासाठी शिकत असतो. बालकांना शाळेत जर उपक्रमांमध्ये समाविष्ट केले, नाटकांमध्ये सहभागी करुन घेतले तर त्यांच्यातील कल्पनाशक्तीचा विकास होण्यास मदत होते. नाटकात बालकांना वेगवेगळया भूमिका कराव्या लागतात. प्रत्येक भूमिकेसाठी त्यांना आपल्यात बदल करावा लागतो. यातून त्यांना नवनवीन कल्पना सुचतात व त्यांच्या कल्पनाशक्तीचा विकास होतो.

**२) तर्कशक्तीचा विकास :** बालक नाटकांमुळे, त्यातील कथानक व संवादामुळे अधिक विचार करू लागतात. कालांतराने ते तर्क लावून नाटकाचा पूर्वार्ध, उत्तरार्ध व शेवट सांगू शकतात. भूमिकेमूळे, अभिनयामुळे, संवादामुळे ते अधिक परिपक्व बनतात. पुढे नाटकात तर्क-वितर्क लावून बदल सुचवू लागतात.

**३) भावनिक विकास :** बालके नाटकात असलेले संवाद वेगवेगळया पद्धतीने बोलतात. भूमिका वेगवेगळया वठवतात यातून त्यांचा भावनिक विकास घडून येतो. संवाद कधीकधी दु:खद, कधी सुखद असतात. त्यात रडणे, हसणे, गाणे, रागावणे, रुसणे, हट्ट करणे इत्यादी प्रकारे भावनांचे प्रकटीकरण करत असतो. उदा. इतिहासातील प्रसंग. 'अफजलखानाचा शेवट' या पाठातील संवादात 'या राजे! या' यावेळेस चेहऱ्यावरील गर्विष्ट हावभाव विद्यार्थी अचूकपणे आणतो. नाटकातील कथानकाच्या मागणीनुसार विद्यार्थी वेगवेगळया भूमिका साकारतात. व त्या भूमिका ते पद्धतशीर वठवतात.यातून त्यांच्यातील सौंदर्यनिष्ठा जागृत होते. ते आपल्या वेशभूषेविषयी, केशभूषेविषयी, संवादविषयी जागरूक होतात.

**४) सामाजिक विकास :** नाटक हे समाजातील वेगवेगळया घटनांवर आधारलेले असते. विद्यार्थी जेव्हा नाटकांमध्ये भूमिका करतात त्यातून त्यांचा सामाजिक विकास घडून येत असतो. नाटकातून समाजाला संदेश दिला जातो आणि याच संदेशान्वये बालकाचाही सामाजिक विकास घडून येतो. अशाप्रकारे बालकांच्या कल्पनाशक्तीचा, तर्कशकतीचा, भावनिक व सामाजिक विकास नाटकाच्या माध्यमातून घडत असतो. त्याचबरोबर त्यांच्यात सौंदर्यशास्त्रीय दृष्टीकोनही विकसीत होत असतो.

**संदर्भ ग्रंथसूची :-**

1) पाटील दिपक व पाटील विनोद, शिक्षणातील नाटय आणि कला
2) आहेर हिरा, उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षक व शिक्षण.
3) पाटील दिपक व पाटील विनोद, शिक्षणाचा विकासात्मक दृष्टिकोण
4) दुनाखे अरविंद, उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षण.
5) काळदाते व कुलकर्णी, उदयोन्मुख भारतीय समाजातील संस्कृती व शिक्षण.
6) पवार ना.ग., भारतीय शिक्षणातील आधुनिक विचार प्रवाह.
7) पाटील विनोद व पाटील दिपक, शिक्षण आणि विकास